पुढारी ८ ऑगस्ट 2003



*जिल्हास्तरीय आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धेत १९ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपद मिळविलेले अनुक्रमे विवेकानंद व कमला महाविद्यालयाचा संघ.* *(छाया : संदीप मोरे)*

# जिल्हास्तरीय शालेय टे. टे. स्पर्धेत विवेकानंद व कमला कॉलेज विजेते

**कोल्हापूर :** जिल्हास्तरीय आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धेत आज १९ वर्षाखालील गटात विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय व कमला महाविद्यालयाच्या संघांनी अनुक्रमे मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने गेले तीन दिवस शाहू स्टेडियम येथील कोर्टवर सुरू असलेल्या स्पर्धेचा आज समारोप झाला.

१९ वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम सामन्यात विवेकानंद महाविद्यालयाने कॉमर्स कॉलेजचा पराभव केला. त्यांच्या ऋषिराज भोसलेने तेजस चिटणीसचा ११-७, निखिल पाटीलने स्वप्नील कुलकर्णीचा ११-६, अजिंक्य जाधवने मंदार रेडेकरचा ११-६ असे हरविले. विजयी संघात त्यांच्या व्यतिरिक्त संग्राम पेटकर व रोहीत कदमचा समावेश आहे.

मुलींच्या गटात कमला महाविद्यालय विजेता ठरला. अंतिम सामन्यात त्यांनी कॉमर्स कॉलेजला पराभूत केले. गायत्री भोसलेने दिपाली बेरगेला ११-९, विनया मोरेने रेश्मा मांगोरेचा ११-८ तर फईजा नाईकवडेने मैथली कशाळकरला ११-७ अशा फरकाने हरविले. मुलांच्या गटात तेजस चिटणीसची निवड करण्यात आली.

विजेत्या संघांना प्रशांत कांबळे यांच्या स्मरणार्थ प्रल्हाद कांबळे यांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. यावेळी कोळेकर, कदम, मनोहर पायमल, संग्राम पाटील, कोळीकर, भास्कर कांबळे, सौ. घाटगे, सौ. साधना पाटील, आंबीटकर आदी उपस्थित होते. संयोजन सौ. मीरा रायबान यांनी केले.

सकाळ ८ ऑगस्ट 2003

# शालेय टेबल टेनिस स्पर्धेत 'विवेकानंद', 'कमला' विजेते

**कोल्हापूर, ता. ७ : येथे आज संपलेल्या जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेज, तर मुलींच्या गटात कमला कॉलेजचा संघ विजयी ठरला.**

शाहू स्टेडियममध्ये स्पर्धा झाली. मुलांच्या गटात 'विवेकानंद'च्या ऋषिराज भोसलेने कॉमर्स कॉलेजच्या तेजस चिटणीसवर ११-७, निखिल पाटीलने स्वप्नील कुलकर्णीस ११-६, अजिंक्य जाधवने मंदार रेडेकरवर ११-६ असा विजय मिळविला. संग्राम पेटकर, रोहित कदम यांनीही प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविला.

मुलींच्या गटात 'कमला'च्या गायत्री भोसलेने 'कॉमर्स'च्या दीपाली बिरजेवर ११-९, विनया मोरेने रेश्मा मांगुरेवर ११-८, फईजा नाईकवडेने मैथिली कशाळकरवर ११-७ असा विजय मिळविला. मुल्ला नर्गिसने आरती कापसेचा पराभव केला.

विजेत्यांना चैतन्य बागवडे, प्रल्हाद कांबळे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. या वेळी मनोहर पायमल, संग्राम पाटील, सौ. साधना पाटील, सौ. मीरा रायबान आदी उपस्थित होते.